# ‘सर्च’ सोबत ‘मुक्तिपथ’ ते टाळेबंदी सोबत ‘मद्यपथ’ : एक समीक्षा

**डॉ. प्रा. प्रतिभा टावरी,** सहयोगी प्राध्यापक व प्रमुख राज्यशास्त्र विभाग,
गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव, महाराष्ट्र

**सारांशः—** कोरोना या साथीरोगाला प्रतिबंध घालण्यासाठी संपूर्ण भारतात टाळेबंदी (लॉकडाऊन) करण्यात आली. अत्यावश्यक सेवा सोडून इतर व्यवसायावर बंदी घालण्यात आली. मद्य (दारु) व तंबाखू व्यवसायावर बंदी घातल्या गेली. टाळेबंदीच्या तिसऱ्या टप्प्यात अनेक व्यवसायावर बंदी कायम ठेऊन दारुबंदी मात्र उठविण्यात आली. त्यामुळे कोरोना प्रसाराचा धोका वाढला. सरकार ‘सर्च’ या स्वयंसेवी संस्थेसोबत व्यसनमुक्तीसाठी ‘मुक्तिपथ’ अभियान राबवून व्यसनमुक्ती कार्याला प्रोत्साहन व बळ देते तर दुसरीकडे कोरोना संकटात मद्य संकट उभे करुन व्यवसनमुक्ती कार्याला हतोत्साहीत करुन त्याची ताकद कमी करते. यामुळे दारुबंदी संबंधी सरकारच्या भूमिकेची समीक्षा करणे आवश्यक व प्रासंगीक ठरते. प्रस्तुत शोधनिबंधात सरकारच्या दारुबंदी संबंधी भूमिकेचे कोरोनाच्या संदर्भात अध्ययन करण्यात आले आहे. डॉ अभय बंग यांच्या व्यसनमुक्ती संबंधी विचार आणि सर्च, मुक्तिपथ चे व्यसनमुक्तीचे कार्य हे या समिक्षणात्मक अध्ययनाचे संदर्भ व आधार आहेत.

**प्रस्तावणाः—** सध्या संपूर्ण जग कोरोना या संसर्गजन्य रोगाच्या विळख्यात सापडले आहे. कोविड—१९ या विषाणू मुळे निर्माण झालेल्या साथीरोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता सामाजिक अंतर राखणे अत्यंत आवश्यक बनले आहे. याकरिता इतर देशाप्रमाणे भारतातही टाळेबंदी (लॉकडाऊन) लागू करण्यात आली. आत्यंतिक आवश्यक सेवा देणाऱ्या व्यवसाया व्यतिरिक्त इतर व्यवसाय बंदी लागू करण्यात आली. टाळेबंदीच्या तिसऱ्या टप्प्यात दारु बंदी उठविण्याचा निर्णय केंन्द्र व राज्य सरकारने घेतला. सामाजिक अंतराचा नियम धाब्यावर बसवत लोकांची गर्दी दारु दुकानांसमोर उसळली. यावर उपाय म्हणून सर्वोच्च न्यायालयाने ‘‘राज्य सरकारने घरपोच दारु पुरविण्याचा विचार करावा’’ अशी सूचना केली. हा निर्णय कोरोनाच्या फैलावाला निमंत्रण देणारा आहे, कोरोनाच्या संकटात शारिरिक, मानसिक, कौटुंबीक स्वास्थ बिगडवण्याचा धोका निर्माण करणारा आहे. व्यसनमुक्तीच्या कार्याला हादरा देणारा आहे, अशा प्रकारच्या प्रतिक्रिया माध्यमात उमटू लागल्या.

डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांनी स्थापन केलेली ‘सर्च’ ही स्वयंसेवी संस्था वर्ष १९८८ पासून व्यसनमुक्तीचे कार्य करीत आहे. ‘सर्च’ च्या कार्यात पुढे राज्य सरकार सहभागी झाले आणि ‘सर्च’ च्या व्यसनमुक्तीच्या कार्याला भक्कम बळ मिळाले. वर्ष २०१६ मध्ये सर्च, राज्य सरकार, टाटा ट्रस्ट व गडचिरोलीची जनता या चार घटकांनी मिळुन व्यसनमुक्तीचे संयुक्तपणे कार्य सुरु केले. आणि या चार शक्तीचे संयुक्त कार्यगट ‘मुक्तिपथ’ नावाने स्थापन झाले. गडचिरोली जिल्हयातील १५०० गांव दारु व तंबाखू मुक्त करण्यासाठी राज्यसरकार ‘सर्च’ सोबत ‘मुक्तिपथ’ हा प्रकल्प राबवित आहे. टाळेबंदीच्या तिसऱ्या टप्प्यात मात्र सरकारला मद्यपथावर चालण्याची आवश्यकता का भासली ? व्यसनाधिनता व व्यसनमुक्ती याचे मानव व समाज यावर काय परिणाम होतात ? सरकार, समाज व व्यक्तीची यासंबंधीची कशी भूमिका असली पाहिजे ? हे प्रश्न व समस्यांचे समाधान शोधण्यासाठी व्यसनमुक्तीसाठी झटणारे सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांचे विचार, कार्य व संशोधन प्रस्तुन शोधनिबंधात मांडण्यात आले आहे.

डॉ.अभय बंग यांच्या व्यसनमुक्ती संबंधी विचारांना वैद्यकिय, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, संदर्भ आहे आणि मानवी जीवनमूल्य व मानवता याचा त्यांच्या विचारांना आधार आहे. महाराष्ट्र राज्य कोरोना साथीरोगाच्या संकटात सापडलेले असतांना मद्यसंकट सरकारने ओढून घेतले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर कोरोनाच्या अनुषंगाने दारु व तंबाखुच्या व्यसनमुक्ती संबंधी डॉ. अभग बंग यांचे विचार व प्रासंगिकता समजून घेणे, त्यांच्या कार्याचा आढावा घेणे आणि सरकारच्या भूमिकेची समीक्षा करणे आवश्यक ठरते.

**शोध निबंधाचे उद्दिष्टः—**

१) कोरोना टाळेबंदीच्या तिसऱ्या टप्प्यात दारुबंदी उठविण्याच्या संदर्भात डॉ. अभय बंग च्या विचार व कार्याचे अध्ययन करणे.

२) सरकारच्या व्यसनमुक्ती संबंधी भूमिकेची समीक्षा करणे.

**गृहितके** :— १) कोरोना टाळेबंदीतील दारुबंदी उठविण्या संदर्भात डॉ. अभय बंग चे व्यसनमुक्ती संबंधी विचार प्रासंगीक आहेत.

२) 'मुक्तिपथ' ची रचना व चार कलमी कार्यक्रमातून मद्य व तंबाखू मुक्ती साध्य करता येते.

**दारुबंदी संबंधी डॉ. अभय बंग व सरकारची भूमिकाः—**

महाराष्ट्रात वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यात शासकीय दारुबंदी आहे. राज्य सरकार गडचिरोलीतील 'सर्च' या स्वयंसेवी संस्थेसोबत 'मुक्तिपथ' अभियानाद्वारा व्यसनमुक्तीच्या मार्गावर मजल दरमजल यशाचे एक—एक पाऊल पुढे टाकीत आहे. सरकार व्यसनमुक्तीचा मार्ग प्रशस्त करण्याची आशा पल्लवीत होत असतांना टाळेबंदीत मद्यपथावर मार्गस्थ होणे 'मुक्तिपथ' ला आव्हाण देणारेच म्हणावे लागेल. याअगोदर जानेवारी २०२० मध्ये सरकारच्या स्थापनेनंतर चंद्रपूरच्या दारुबंदीसमोर आव्हाण उभे राहिले होते. राज्याचे नवे अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्याचा महसूल वाढविण्यासाठी अर्थमंत्रालयाचा आढावा घेतांना दारुबंदी संबंधी चर्चा करण्यात आली. चंद्रपुरच्या पालकमंत्र्यानी चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी उठविण्याबाबत विधान केल्याबरोबर ही चर्चा आणखिनच ऐरणीवर आली. आणि आता टाळेबंदीत दारुबंदी उठविण्याच्या निर्णयामुळे पुनश्चः दारुबंदीसंबंधी चर्चा जोमात सुरु झाली. हा वर्षारंभ दारुबंदीच्या चर्चेने सुरु झाला. दारुबंदीच्या समर्थनार्थ व विरोधात सूर उमटू लागले. व्यसनमुक्ती चळवळीतील नेतृत्वाच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याकरिता माध्यमे त्यांचाकडे वळली. डॉ. अभंग बंग, डॉ. कल्याण गंगवाल, पारोमिता गोस्वामी, डॉ. मुक्ता पुणतांबेकर यांनी सरकारच्या धोरणावर टिका करत यातून निर्माण होणारे धोके दाखवून दिले. दारुबंदीचा विरोध करणारे प्रामुख्याने दोन कारणे सांगतात. दारुबंदी केली तर दारुची अवैध विक्री सुरु होते. त्यामुळे दारुबंदी यशस्वी होत नाही आणि सरकारचा कर ही बुडतो. दुसरे असे की दारुमुळे सरकारला मिळणारे प्रचंड उत्पन्न / महसुल याचे नुकसान होते. आणि म्हणूनच लॉकडाऊनमुळे ढासळलेल्या अर्थव्यवथेला सावरण्याकरिता दारुबंदी उठविण्याचा निर्णय घेतला गेला.

''उठवलेली दारुबंदी हे शासनाचे अतर्क्य पाऊल आहे'' असे मत डॉ. अभय बंग ने सरकाने दारुबंदी उठविल्यानंतर व्यक्त केले. कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी अनेक प्रकारची बंदी कायम ठेवताना शासनाने दारुच्या विक्रीला परवानगी दिली. दारुमुळे दरवर्षी किती मृत्यु होतात ही जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलेली आकडेवारी डॉ. अभय बंग कोरोनाच्या संदर्भात मांडतात. भारतात आतापर्यंत ४२ हजारावर लोकांना कोरोना आजाराचा संसर्ग झाला आहे. १३०० च्या वर मृत्यु झाले आहेत. ही आकडेवारी दिवसेंदिवस वाढत आहे. पण त्याच वेळी भारतात दरवर्षी दारुमुळे ५ लाख मृत्यु होतात. भारतातील ५ कोटी लोक दारुच्या व्यसनाने ग्रसित आहेत. त्यामुळे ''शासनाने हत्ती सोडला आणि शेपूट धरुण ठेवले'', अशी डॉ. अभय बंग यांनी सरकारच्या धोरणावर टिका केली. कोरोना पसरु शकतो या भीतीने अनेक घरपोच सेवा बंद करण्यात आल्या. त्या न्यायाने घरपोच दारु म्हणजे 'घरपोच कोरोना सेवा' ठरु शकते, असे म्हणत डॉ. बंग नी काही सवाल उपस्थित केले. दारु पोटात व डोक्यात गेल्यानंतर मद्यपी सामाजिक अंतर राखू शकेल का ? न्यायालयाला दारु ही नागरिकांची मूलभूत गरज व हक्क वाटतो का ? दारुबंदी उठविल्यामुळे कोरोना चा संसर्ग होणार असेल तर जीव महत्वाचे की उत्पन्न ? जीवापेक्षा उत्पन्न महत्वाचे असेल तर कोरोनाचा फैलाव थांबावायला गेले पंचेचाळीस दिवस पूर्ण देशाच्या व जनतेच्या उत्पन्नाला उगाच का थांबवून ठेवले ? घरपोच दारुमुळे स्त्रियांवर कौटूंबीक हिंसाचार होतील त्यामुळे कौटुंबीक स्वास्थावर होणाऱ्या परिणामाचा विचार केल्या गेला का ? या प्रश्नांची तसेच दारुबंदीच्या विरोधात व्यक्त होणाऱ्या मताची उत्तरे, डॉ. अभय बंग काही अध्ययनाची दाखले देतात ह्यात मिळतात.

पी.जी. आय. चंदीगढ या भारत सरकारच्या शिखर संस्थेचे तज्ञ डॉ. शंकर प्रिंजा, राजेशकुमार यांनी आंतरराष्ट्रीय नियकालिकात हिशोब प्रकाशित केला आहे. त्यानुसार २०११ ते २०५० या चाळीस वर्षात भारतातील सरकारांना दारु पासून जितका कर मिळेल त्यापेक्षा दरवर्षी अडीच लक्ष कोटी रुपये किंवा देशाच्या जीडीपीच्या पाऊणे दान टक्का एवढे जास्त नुकसान होईल. देशाच्या आरोग्यावर भारतातील सर्व शासने मिळून खर्च करतात. १.२ टक्का जी.डी.पी. आणि दारुमुळे कर वजा जाता नुकसान पाऊने दोन टक्का जीडीपी आहे. त्यामुळे डॉ बंग म्हणतात. ''दारुचे अर्थशास्त्र हे वस्तुत: अनर्थशास्त्र आहे.'' दारुबंदीमुळे महसुल बुडतो, असे जे मत सर्वत्र मांडले जाते. याबाबत बोलतांना डॉ. बंग म्हणतात, चंद्रपुरच्या दारुबंदीच्या निर्णयाआधी तेथे सॅपल सर्व्हे करुन जिल्ह्यात किती रुपयांची दारु खपते याची आकडेवारी काढली होती. तेव्हा चंद्रपुरमध्ये लोक प्रतिवर्षी १९२ कोटी रुपयांची दारु पितात, असे दिसून आले. दारुबंदीनंतर याच पध्दतीने सर्व्हे केला तेव्हा त्यात ९० कोटीची घट झाल्याचे दिसून आले म्हणजेच हा पैसा लोकांनी दारुऐवजी घरात वापरला. याचा अर्थ असा की चंद्रपूरच्या जनतेला एका वर्षात ९० कोटींचा फायदा झाला. जर दारुबंदीची अंमलबजावणी नीट झाली तर लोकांना त्यापेक्षा जास्त फायदा होईल. भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली आहे. सरकारला मिळणारे उत्पन्न सरकार जनतेच्या कल्याणाकरिता खर्च करते. दारुबंदीमुळे सरकारच्या उत्पन्नाची घट सरळ लोकांच्या घरात वापरली जाते. दारुच्या वाईट व्यसनावर खर्च न करता लोक स्व कल्याणसाठी पैसा खर्च करतात. डॉ. बंग म्हणतात कोणत्याही सरकारी योजनेचा १०० टक्के फायदा जनतेला मिळत नाही पण दारुबंदीमुळे वापरलेल्या उत्पन्नाचा जनतेला १०० टक्के फायदा मिळतो. आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेला गुजरात राज्यात गेली सत्तर वर्ष दारुबंदी आहे. दारु शिवाय आर्थिक विकास साधता येतो, राज्य चालविता येते याचे गुजरात राज्य उदाहरण असल्याचे डॉ. अभय बंग प्रतिपादन करतात.

शिफ्रीन या अमेरिकेतील अर्थशास्त्रज्ञापासुन तर भारतातील नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ मेंटल हेल्थ ॲन्ड न्यूरोसायंसेस (NIMHANS) या सर्वाच्च संस्थेच्या प्रकाशित अहवालानुसार दारुमुळे मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा दारुची समाजाला व शासनाला मोजावी लागणारी एकूण किंमत जास्त असते. 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज' या सार्वजनिक आरोग्याच्या आजवरच्या सर्वात विराट अभ्यासानुसर मृत्यू व रोग निर्मितीच्या सर्वाच्च १० कारणांपैकी दोन कारणे दारु व तंबाखू आहेत. ही माहिती देत असतांना डॉ. बंग धोक्याचा इशारा देतात की दारु व तंबाखू आता निव्वळ विरंगुळ्याचे पदार्थ राहिलेले नाहीत. आधुनिक वैद्यकशास्त्रानुसार ते जणु २१ व्या शतकातील प्लेग व कॉलऱ्याचे जंतु आहेत. रोगजंतुचे उच्चाटन करायचे असते. उत्पन्न व उत्पादन नाही. डॉ. बंगचा हा महत्वाचा विचार लक्षात घेणे आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटनेने भारतात दरवर्षी दारुमुळे पाच लक्ष मृत्यू होत असल्याचे प्रकाशित केले आहे. असे प्रतिपादन करतांना डॉ. बंग म्हणतात, जगातील कोणत्याही विषापेक्षा होत नाहीत, एवढे जास्त मृत्यू त्याचप्रमाणे हृदयरोग, पक्षाघात, रक्तदाब, कर्करोग यासारखे २०० प्रकारचे रोग या दोन विषारी पदार्थामुळे होतात असा दारुचा दुष्परिणाम विशद करतांना डॉ. बंग म्हणतात, ''खरोखरच हे व्यसन आजच्या जगातील मृत्युपथ झाले आहेत'' दारुबंदी असलेल्या भारतातील पाच राज्यांचा अभ्यास करुन हॅवॉर्ड विद्यापिठ व वर्ल्ड बॅकच्या तज्ञांनी असा निष्कर्ष काढला की दारुबंदीमुळे त्या राज्यातील स्त्रियांवरील हिंसा व गुन्हे ५० टक्क्यांनी कमी झाले. यावरुन स्पष्ट होते की दारुबंदी मुळे सामाजिक स्वास्थ राखण्यात खुप मोठी मदत होते.

अशाप्रकारे विविध अध्ययनातून दारु व तंबाखूच्या व्यसनाचे महाभयंकर दुष्परिणाम डॉ. अभय बंग नी दाखवून दिले आहे. राजकीय नेतृत्व व सरकारनेही वेळोवेळी दारुबंदीला पाठींबा दिल्याचे दिसून येते.

दारुबंदीसाठी चिमूर येथून तब्बल पाच हजार महिलांनी पायदळ नागपूर पर्यंत मोर्चा काढला होता. त्यानंतर कॉंग्रेस आघाडी सरकारच्या काळात १० डिसें. २०११ रोजी विधानसभेत चंद्रपूरच्या दारुबंदीच्या प्रश्नावर चर्चा होऊन समिती गठित केली होती. या समितीचा अहवालही आघाडी सरकारच्या काळातच तयार झाला आणि त्याची अंमलबजावणी भाजप चे सरकार राज्यात आल्यावर करण्यात आली. या निर्णयाच्या आधार ठरला होता ५८८

ग्रामपंचायती चा ठराव. त्यावेळेसचे तत्कालीन ना. जयंत पाटील यांनी आमचे सरकार आल्यानंतर यवतमाळ जिल्ह्यात दारुबंदी करु असे त्याच्या भाषणात म्हटले होते. खासदार सुप्रिया सुळे यांनी तर तंबाखू मुक्तीचे आंदोलन सुरु केले होते. अनिल देशमुख यांनी मंत्री असतांना गुटखा बंदीचा निर्णय घेतला होता. गडचिरोलीत १९९३ ला दारुबंदीचा निर्णय शरद पवार मुख्यमंत्री असतांना घेतलेला आहे. चंद्रपुर जिल्ह्याच्या दारुबंदीसाठी डॉ. राणी बंग, अजित पवार यांना भेटल्या होत्या तेव्हा त्यांनी चंद्रपुरच्या दारुबंदीला पाठींबा दर्शविला होता. वर्धाची १९७७ पासूनची दारुबंदी, गडचिरोलीची १९९३ पासूनची दारुबंदी आणि चंद्रपूरची २०१५ पासूनची दारुबंदी या सर्व शासकीय दारुबंदीचे निर्णय तत्कालीन सरकारांनी घेतले. दारुबंदीसाठी त्या—त्या जिल्ह्याच्या जनतेने दिलेला प्रदिर्घ लढा आणि खंबीर नेतृत्व यामुळे सरकारनी संबंधीत जिल्ह्यात दारुबंदी लागु केली. बुलडाणा, यवतमाळ जिल्ह्यातही दारुबंदीसाठी चळवळी सुरु आहे. दारुबंदीचे दुष्परिणाम बघता पुर्वीच्या सरकारने घेतलेला दारुबंदीचा चांगला निर्णय रद्द करण्याचा विचार न करता त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी असे डॉ. अभय बंग तळमळीने मांडतात.

**मुक्तिपथ :—**

१९९३ मध्ये गडचिरोलीत दारुबंदी लागू झाल्यानंतर संमेलन व सर्वेक्षणच्या माध्यमातुन दारुबंदीची स्थिती वेळोवेळी तपासल्या जात होती. मार्च २०१५ मध्ये 'सर्च' या संस्थेने गोंडवाना विद्यापीठाच्या सहयोगाने गडचिरोली जिल्ह्याचे सर्वेक्षण केले. यात ११ लाख लोकसंख्या असलेला आणि दारुबंदी असलेला गडचिरोली जिल्हा व दारुबंदी नसलेला चंद्रपुर जिल्ह्यातील निम्मी लोकसंख्या म्हणजे ११ लाख लोकसंख्या यांचे तुलनात्मक अध्ययन केल्यानंतर गडचिरोलीत ५७ कोटीची दारु कमी झाल्याचे दिसून आले. दारुबंदीला यश मीळत होते पण जिल्ह्यात सर्वव्यापी यश मिळावे याकरिता फक्त दारुबंदी नाही तर दारुमुक्तीसाठी कार्यक्रम, आखण्यात आला 'मुक्तिपथ'. तीन वर्षात जिल्हयातील दारु व तंबाखू निम्म्याने कमी करण्याचे लक्ष्य ठेऊन चार कलमी कृती कार्यक्रम आखण्यात आला.

१. व्यापक माहिती व जनजागृती २. गावागावात सक्रिय लोकसहभाग

३. बंदीची प्रभावी अंमलबजावणी ४. व्यसनमुक्ती उपचार.

वर्ष २०१६ मध्ये दारु व तंबाखू दोघांपासून एकत्र मुक्तीचा 'मुक्तिपथ' हा जिल्हाव्यापी प्रयोग भारतात प्रथमच सुरु झाला. 'मुक्तिपथ' हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारचा कार्यगट, सर्च संस्था, टाटा ट्रस्ट व गडचिरोलीतील जनतेचा संयुक्त प्रकल्प आहे. जिल्हा समिती, तालुका समिती व गावोगावी ग्रामसमिती अशी याची रचना आहे. दृढ संकल्पाने, कठोर परिश्रमातून, खंबीरपणे सर्व स्तरावर दारु व तंबाखू मुक्तीचे निरंतर प्रयत्न सुरु आहे. वर्ष २०१७ पर्यंत ३०० गाव व्यसनमुक्त झाले. खुर्सा, गरंजी, टेंभा अशा अनेक गावांचा समावेश यात आहे. २२ वर्षापासून दारुबंदी गडचिरोली जिल्ह्यात आहे. २०१९ पर्यंत ६०० गावांनी सामूहिक निर्णयाने आपल्या गावात दारुबंदी केली. गावाच्या साथीला मुक्तिपथ भक्कमपणे उभे आहे. मुक्तिपथच्या चार कलमी कार्यक्रमातून दारुबंदी साध्य करता येते हे स्पष्ट झाले आहे. असंख्य अडचणी, अनेक आव्हानेला सामोरे जात गडचिरोलीची जनता सर्वव्यापी दारुबंदी करिता डॉ. बंग दाम्पत्याच्या खंबीर नेतृत्वात अथक प्रयत्न करीत आहे.

**निष्कर्ष :—**

गडचिरोलीतील सहाशे गावांनी हिंमतीने संघर्षाने, अथक प्रयत्नाने कायद्याचा आधार घेऊन दारुबंदी केली. गडचिरोलीची जागरुक जनता, निस्वार्थ नेतृत्व करणारे मानवतावादी डॉ. बंग दाम्पत्य, शासकीय दारुबंदी लागू करणारे व मुक्तिपथला ताकद देणारे महाराष्ट्र सरकार व्यसनमुक्तीसाठी आदर्श ठरतात. दारुबंदीचा मार्ग अत्यंत खडतर आहे. म्हणुनच व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करणाऱ्यांना सरकारने कायद्याचे पाठबळ घ्यायला हवे. राज्यघटनेच्या ४७ व्या कलमानुसार व्यसनमुक्ती करणे सरकारचे कर्तव्य आहे. राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागानुसार 'व्यसन' हा विषय सामाजिक न्यायाच्या कक्षेत येतो म्हणून व्यसनमुक्तीकडे सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून बघने सरकारची जबाबदारी ठरते. कोरोना संकटात लॉकडाऊन मध्ये करण्यात आलेली दारुबंदी व्यसनमुक्तीसाठी संधी आहे. व्यसनाधिन व्यक्तीला

व्यसनातून बाहेर पडण्यासाठी कोरोनाने एकप्रकारे मदतच केली. आम्ही महाविद्यालयात तरुणांना व्यसनापासुन दूर ठेवण्यासाठी व्यसनमुक्ती उपक्रम राबवितो. लॉकडाऊन मध्ये मला एका विद्यार्थ्याचा फोन आला की त्याची गुटखा खाण्याची सवय बंद झाली. गुटख्या शिवाय मी राहू शकतो यापुढे कधीही गुटखा सेवन करणार नाही असे त्यानी सांगितले. लॉकडाऊनच्या तिसऱ्या टप्प्यात दारुबंदी उठविल्यानंतर असे बरेच तरुण विद्यार्थी डोळ्यासमोर आले आणि व्यसनमुक्तीचे महत्व सांगणारे उपक्रम महाविद्यालयात घ्यावे तर सरकारच्या या धोरणावर विद्यार्थ्यांसमोर काय बोलावे हा प्रश्न निर्माण झाला.

दारुबंदी विविध आजारांना निमंत्रण देणारी व सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करणारी आहे. सार्वजनिक आरोग्याचे महत्व कोरोनाने आम्हाला शिकविले. सार्वजनिक आरोग्यासाठी उत्तम यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता कोरोनाने दाखवून दिली. मद्य हा सरकारला उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत आहे हे अप्रस्तुत ठरते हे या शोधनिबंधातून स्पष्ट झाले आहे. मद्य हे शारिरिक, मानसिक, कौटुंबिक, सामाजिक स्वास्थासाठी अत्यंत घातक असल्याचे सिध्द झाले आहे. तेव्हा दारुच्या व्यसनाकडे व्यक्ती, समाज व सरकार सर्वांनी डोळसपणे बघणे गरजेचे आहे. समाजातून दारुची मागणी कमी झाल्यास सरकार उत्पन्नासाठी दारु ला महत्व देणार नाही. टाळेबंदीतील दारुबंदी उठविल्यानंतर दारु घेण्यासाठी सर्वेच थराच्या लोकांनी रांग लावली. ही भली मोठी रांग पाहुन साहजिकच प्रश्न निर्माण झाला की, ज्या जनतेला राशन मुफ्त पाहिजे, नानाविध सवलती पाहिजे, कर्जमाफी पाहिजे हीच जनता दारुसाठी मात्र कितीही किंमत दयायला तयार आहे. सरकारल विना तक्रार, विना सवलत, दारुतून जनता उत्पन्न देत असेल तर बोट कोणाकडे दाखवावे ?

भारतात जवळपास वीस कोटी माणसं दारु पितात. त्यापैकी पाच कोटी हे दारु दुष्परिणाम ग्रस्त आहेत व त्यापैकी दरवर्षी पाच लक्ष लोक मरतात. असा दारुचा जमा खर्च डॉ. बंग मांडतात. कोरोनाला थांबविण्यासाठी भारताने दारु व तंबाखू विक्री बंद केली आहे. कोरोनामुळे आजपर्यंत भारतात जेवढे मृत्यु झाले नाही तेवढे दारुमुळे होतात. डॉ. बंग म्हणतात, दारुमुळे दरवर्षी पाच लक्ष व तंबाखूमुळे दहा लक्ष मृत्यु होतात. कोरोनाच्या निमित्याने दारु व तंबाखू बंदी किंवा कमी झाल्यास अनेक पट मोठा फायदा होईल. मनुष्य जीवन सुरक्षीत ठेवता येईल. शासनाने व समाजाने ही आलेली संधी गमावू नये, असे तळमळीने डॉ. अभय बंग आवाहन करतात. व्यसनमुक्त, निरामय, निरोगी जीवन हीच आयुष्यातील खरी धन संपदा आहे. असा कोरोनाच्या माध्यमातून निसर्गाने मानवाला पुनश्च: संदेश दिला आहे. स्वस्थ, सुसंस्कृत, मूल्यसंपन्न, सामाजिक स्वास्थवर्धक जीवन जगण्याकरिता सर्वांना ठिकठिकाणी मुक्तिपथ निर्माण करावे लागेल आणि त्याचे पथिक व्हावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**

१) https://www.esakal.com
२) https://m.lokmat.com
३) https://berartimes.com
४) http://searchforhealth.ngo
५) https://divyamarathi.bhaskar.com
६) https://www.bbc.com
७) https://marathi.abplive.com
८) https://hellomaharashtra.in
९) https://www.lokmat.com
१०) https://m-marathi.webdunia.com